सरस्वती, सावित्री, अदिती, लक्ष्मी

अक्षय कथा

Bha
1587

दुर्गा भागवत

Bha
1587
10.8.15

सरस्वती सावित्री आदिती लक्ष्मी

रा.कृ. म्हाळगी संस्कार
मुंबई

लेखिका
दुर्गा भागवत

APSS LIBRARY
1587

ओरिएंट लाँगमन

ओरिएंट लाँगमन लिमिटेड
रजिस्टर्ड कार्यालय
३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९
इतर कार्यालये
कामाणी मार्ग, बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८
१७ चित्तरंजन अ‍ॅव्हेन्यू, कलकत्ता ७०० ०७२
१६० अण्णा सलाई, मद्रास ६०० ००२
१/२४ असफअली मार्ग, नवी दिल्ली ११० ००२
८०/१ महात्मा गांधी मार्ग, बंगळूर ५६० ००१
३-६-२७२ हिमायतनगर, हैद्राबाद ५०० ०२९
सिटी सेंटर अशोक, गोविंद मित्रा मार्ग, पाटणा ८०० ००४
हाऊस नं २८/३१, १५ अशोक मार्ग, लखनौ २२६ ००१
एस. सी. गोस्वामी मार्ग, पानबझार, गुवाहाटी ७८१ ००१
प्लॉट नं. २०५-ए, शहीद नगर, भुबनेश्वर ७५१ ००७

© ओरिएंट लाँगमन लिमिटेड, १९९४

ISBN 0 86125 969 6

Bha
1587
10.8.15

फोटो टाईपसेटींग
कुलभूषण कॉम्प्युसेट कॉर्पो., मुंबई ४०० ०२८
मुद्रक
बिंदू आर्ट, लोअर परळ, मुंबई ४०० ०११
प्रकाशक
ओरिएंट लाँगमन लि., कामाणी मार्ग,
बॅलॉर्ड इस्टेट, मुंबई ४०० ०३८

सरस्वती

सरस्वती ही भारतीयांची फार आवडती देवता आहे. वेदकाळापासून ते आतापर्यंत हिची अपार भक्ती लोक करतात. अदितीबरोबरच अगदी प्रारंभ काळी हिचा उल्लेख वेदात येतो. तसाच उल्लेख पुढच्या काळात लक्ष्मीबरोबरही येतो.

सरस्वतीला विद्येची, बुद्धीची, कलेची नि शास्त्राची देवता मानतात. ती रूपवती आहे. कुंदाच्या फुलाप्रमाणे तिची कांती शुभ्र-धवल आहे. मुख शांत नि प्रसन्न आहे. बांधा डौलदार आहे. तिला चार हात असतात. तिच्या चारी हातात वीणा, पुस्तक, अक्षमाला आणि जलकुंभ असतात. हंस पक्षाला तिचं वाहन समजलं जातं नि कधी लक्ष्मीप्रमाणे कमळसुद्धा.

नदी-देवता

वेदात गंगेप्रमाणेच सरस्वतीही नदी-देवता आहे. ती वाहत्या, खळखळत्या, पाण्याचं म्हणजेच जीवनाचं प्रतीक आहे. ती नदीस्वरूप आहे. नदी या शब्दाचा अर्थ 'नाद करणारी' असा आहे. वाहत्या पाण्याचा आवाज

होतो; पडत्या पावसाचा आवाज होतो; जलाशयात त्या लाटांचा आवाज होतो; नादालाच शब्दही म्हणतात, म्हणून नदी ही निनादत जाणारी, गतिमान, जीवनदायी अशी जलधारा आहे. कधी ती शांत असते, तर कधी रुद्र. जेव्हा ती गरजते तेव्हा भय उत्पन्न करते. नदी जसं जीवनाचं प्रतीक आहे तसंच मृत्यूचंही आहे; म्हणून वेदातली सरस्वती अदितीप्रमाणे निर्मितीही करते आणि विनाशसुद्धा.

पण ही नदी-देवता सरस्वती, बुद्धीची आणि वाणीची पण देवता आहे. नदीची स्वरमयता तिच्यात आहे. या नदीची वाणी बुद्धीतून स्फुरलेली आहे. तिला सूर आहे, लय आहे, गती आहे. मूळ सरस्वतीच्या या गुणांचा विकासच संस्कृतीत अखंड झालेला दिसतो. ज्ञानस्वरूपिणी सरस्वतीच्या कथा बदलत गेल्या; पण तिचं कार्य बदललं नाही.

वेदकाळी सरस्वती धनधान्याची देवता होती; लक्ष्मीप्रमाणेच समृद्धीचीही देवता होती. नवरात्राचा उत्सव हा सरस्वतीचा किंवा शारदेचा उत्सव असतो. त्यात धान्याची महती येतेच.

सरस्वतीच्या कथा

सरस्वतीच्या कथांमध्ये जेवढा बदल झाला आहे, तेवढा कुठल्याही देवतेच्या कथांमध्ये झालेला नाही. वेदात तिची स्वतंत्र कथा नाही. ज्या काही कथा आहेत त्याही धूसर अशाच आहेत. पार्वतीप्रमाणे घरगुती कथांचं वलय हिच्याभोवती नाही असं म्हटलं तरी चालेल. पण एक गोष्ट मात्र खरी की अदिती जशी पुढे जनजीवनातून लोपली, तशी ही लोपली तर नाहीच पण नदीप्रमाणेच वेगवेगळी वळणं घेत, लोकजीवनाला आकार देत चाललीच आहे. आता आपण तिच्या कथांचा मागोवा घेऊया.

ब्रह्मदेव आणि सरस्वती

ब्रह्मदेव हा सृष्टीचा कर्ता. त्याला दक्ष, नारद वगैरे मानस-पुत्र होतेच. एकदा त्याला वाटलं, आपण एकटे का ? आपण 'पुष्कळ' व्हावं. मग त्यानं पुष्कळ व्हायची इच्छा केल्यावर त्याला मानसपुत्र झाले.

पुढे काय झालं ? त्याला वाटलं की आपल्या मनातून जसे मुलगे झाले; तसेच आपल्या शरीरातूनसुद्धा निर्माण व्हावे. लगेच त्याची इच्छा फळाला आली. त्यातूनच एक नवल घडलं. ब्रह्मदेवाचे दोन भाग झाले. एक पुरुषाचा भाग, म्हणजेच त्याचा स्वतःचा पुरुष भाग आणि दुसऱ्या भागातून मात्र स्त्री प्रकटली. ब्रह्माच्या अर्ध्या शरीरातून निघालेली ही देवी इतकी सुस्वरूप होती की ही आपली

मुलगी आहे ही गोष्टही ब्रह्मदेव विसरला. त्याचं भान हरपलं.

"अहाहा ! किती सुंदर हे रूप ! किती सुंदर !" ब्रह्मदेव उद्गारला.

हे उद्गार त्यानं आपल्या मानसपुत्रांपुढे काढले. ते तिचे बंधु आहेत हेही तो विसरला. आपल्या स्वतःच्या कन्येच्याबाबतीत ब्रह्मदेवाची अभिलाषा पाहून ते मानसपुत्र चकित झाले. त्यांना हे आवडलं नाही. सरस्वतीनं त्याला नमस्कार करून प्रदक्षिणा घातली. ती जसजशी त्याच्याभोवती फिरू लागली तसतसं चारी बाजूंनी तिला पाहाण्यासाठी ब्रह्मदेवाला चार तोंडं फुटली. सरस्वतीलाही ब्रह्मदेवाची वृत्ती आवडली नाही. ती वर-वर जात स्वर्गात गेली. वर बघताना ब्रह्मदेवाला पाचवं तोंड फुटलं. ते पुढे शिवानं तोडलं अशी गोष्ट आहे.

पण नंतर ब्रह्मदेवानं सरस्वतीचं मन वळवलं आणि मग दोघं एकत्र नांदू लागली. ब्रह्मदेवापासून तिला स्वायंभुव मनू नावाचा मुलगा झाला. परंतु या संबंधामुळे ब्रह्मदेवाला पाप लागलं. त्याचं देवलोकातलं माहात्म्य उणावलं. तेव्हा त्यानं सारं सोडलं आणि परत त्यानं उग्र तप करायला सुरुवात केली.

विष्णु आणि सरस्वती

ब्रह्मदेवाची पूजा बंद झाली; तशी सरस्वतीची कथाही बदलली. नवीन कथेनुसार तिचा जन्म विष्णूच्या जिभेतून झाला, म्हणून ती वाणीची, गायनाची, संगीताची नि विद्येची देवता झाली. विष्णूबरोबर लक्ष्मी राहात होती. लक्ष्मी संपत्तीची देवता, तर सरस्वती धर्ममयतेची व तपस्येची देवता. पुढच्या काळात विष्णूबरोबरची सरस्वतीची सांगड तुटली; पण लक्ष्मीबरोबरची सुटली नाही. महालक्ष्मीत लक्ष्मी नि सरस्वती दोघी सामावल्या आहेत.

गणपती व सरस्वती

पुढे लक्ष्मी-नारायणाचा जोडा परंपरेने पक्का करून टाकला. ब्रह्मदेव हा खरा धर्माचा नि विद्येचा प्रणेता; पण तो तर अस्तंगतच झाला. का ते आपण पहिल्या कथेत पाहिलेच आहे. त्यानंतर शतकांचा अवधी लोटल्यावर शंकर नि पार्वती यांचा मुलगा गणपती याची सरस्वती ही सुलक्षणी नि लाडकी पत्नी झाली. गणपती आणि सरस्वती यांची सांगड कायमची पडली. गणपतीशी सरस्वतीचं लग्न कसं झालं, याची एक गोष्ट सांगतात. ती गोष्ट अशी : शंकर-पार्वतीला दोन मुलगे होते. ब्रह्मदेवाची सुंदर कन्या सरस्वती उपवर झाली

आणि कार्तिकेयाचं तिच्यावर मन बसलं. गणपतीलाही सरस्वती आवडली होती; पण कार्तिकेय स्वभावानं रागीट होता म्हणून तो बिचारा गप्पच राहिला.

सरस्वती चतुर. तिनं दोघा भावांचं मन ओळखलं नि ठरवलं की दोघा भावांमधला जो जास्त बुद्धिमान असेल त्यालाच वरायचं. तिने एक अट घातली; पार्वतीने ती मुलांना सांगितली. "तुम्ही दोघेही पृथ्वीची प्रदक्षिणा पूर्ण करा. जो कुणी आधी पुरी करील तो जिंकला असं समजायचं," पार्वती म्हणाली.

झालं ! कार्तिकेय मोठा पराक्रमी होता; चपळ होता. गणपती बिचारा ढेरपोट्या; आणि त्याचे पायही होते आखूड. तेव्हा आपणच पैज जिंकणार असं कार्तिकेयाला वाटलं. तो पळतच निघाला.

तो नजरेआड झाल्यावर गणपतीनं क्षणभर विचार केला. मग त्यानं पार्वती-मातेला वंदन केलं नि तिला प्रदक्षिणा घातली. आईलाच त्याने पृथ्वी मानली; त्रिभुवन मानलं. सरस्वतीला त्याची युक्ती फार आवडली. तिनं ताबडतोब गणपतीला माळ घातली.

बिचारा कार्तिकेय काही दिवसांनी पृथ्वी-प्रदक्षिणा करून घरी परतला. आता सरस्वती आपलीच होणार याबद्दल त्याच्या मनात जराही शंका राहिली नाही.

त्याला वाटलं आता आईदेखील आपलं कौतुक करील; कारण गणपती बोदलेबुवा अजून अर्ध्यावरसुद्धा पोचले नसतील. पण घरी परतल्यावर त्याला वेगळाच देखावा दिसला. गणपती मजेत बसला होता नि सरस्वती त्याच्या सेवेत गुंतली होती. पार्वती कौतुकाने लेकाकडे नि सुनेकडे बघत होती. हे सर्व पाहून कार्तिकेय संतापाने लाल झाला. गणपतीची क्लृप्ति त्याला कळली. सरस्वतीची त्याला चीड आली; घृणा आली. आईचाही तिटकारा आला. "आजपासून बाईमाणसाचं तोंड पाहाणार नाही," असं म्हणून तो घराबाहेर पडला. त्यानंतर कार्तिकेय आजन्म ब्रह्मचारी राहिला. अखंड तप करण्यातच त्यानं आपलं आयुष्य वेचलं.

बाणभट्टाची कुळकथा

सरस्वतीची बाणभट्टाने आपल्या आत्मचरित्रात दिलेली कथा तिच्या इतर कथांपेक्षा थोडी वेगळी आहे. ती कथा अशी : ब्रह्मलोकांत ब्रह्मदेवाची सभा भरली होती. ब्रह्मदेव कमळावर बसला होता. अवतीभोवती इन्द्र वगैरे देव आपापल्या आसनांवर बसले होते. सभेत विद्या-गोष्टी चालल्या होत्या. चर्चाही चालू होत्या. त्या प्रसंगी दुर्वास आणि मंदपाल या दोन ऋषींत वाद माजला. मग दुर्वास बेसूर स्वरामध्ये सामगायन करू

लागला. सारे मुनी घाबरून गप्प बसले. सुंदर, सुस्वर सामगायनाचं बेरूप दुर्वासाने केलं होतं. खरं सांगायचं तर त्याचं ते तसं गाणं अयोग्यच होतं; पण क्रोधी दुर्वासाला कोण सांगणार ? त्याचं आचरण पवित्र होतं; पण उग्र होतं. त्याच्या शापवाणीला, देव, मुनी सारे भ्यायचे. सभा स्तब्ध झाली. ब्रह्मदेवाने दुसऱ्या गोष्टी काढून चर्चा टाळायचा प्रयत्न केला. उगीच वादंग माजलं तर त्यातून अनिष्ट व्हायचं हे ठरलेलंच होतं. तेच ब्रह्मदेवाला नको होतं.

पण अनिष्ट टळलं नाहीच. ब्रह्मदेवावर सरस्वती चवरी ढाळीत होती. सामगायनात ती तरबेज होती. वीणेवर ती सामगान वाजवायची; स्वतः गायची. तशी ती त्या वेळी अल्लडच होती; पोरसवदा होती. दुर्वासाचं बेसूर गाणं ऐकून तिला हसू आवरेना. तिचं हसणं पाहून दुर्वासाला विलक्षण संताप आला. "सरस्वती, माझी कुचेष्टा करतेस काय ? तू सत्यलोकात पृथ्वीवर जा," असा दुर्वासानं तिला शाप दिला. सारी सभा भयचकित झाली. सरस्वतीचं हसणं थांबलं; रडणं सुरू झालं. दुर्वासाच्या पाया पडून तिनं त्याची क्षमा मागितली. ब्रह्मदेवानं रदबदली केली. 'हिला पुत्र होईपर्यंत ती पृथ्वीवर राहील,' असं दुर्वासानं ब्रह्मदेवाला मान देऊन सांगितलं.

पडल्या चेहऱ्याने सरस्वती पित्यासमोर उभी राहिली. तिच्या डोळ्यातून आसवं वाहात होती. ब्रह्मदेव तिच्या डोकीवर हात फिरवून म्हणाला, ''मुली, भिऊ नको निःशंक मनानं पृथ्वीवर जा. सावित्री तुझ्या सोबतीला येईल.'' सावित्री तिची माताच. ब्रह्मदेवानं सरस्वतीला आश्वासन दिलं, ''तुला मुलगा होईपर्यंत ती तुझ्या बरोबर असेल''. ब्रह्मदेवाला नमस्कार करून त्या दोघी पृथ्वीवर उतरल्या.

सरस्वती सावित्रीबरोबर विंध्य पर्वतावरच्या चंद्रपर्वत नावाच्या शिखरावर (बहुधा अमरकंटकावर) उतरल्या. शोण नदी तिथूनच निघाली होती. शोण नदीच्या काठी हिंडताना सरस्वतीला च्यवन मुनिचा आश्रम दिसला. च्यवन मुनिचा तरुण रूपवान मुलगा दधीच आश्रमात बसला होता. त्याला पाहून सरस्वती आश्रमात शिरली. तिचं मन दधीचवर बसलं. दधीचला देखील ही तरतरीत रूपवती सरस्वती फार आवडली. त्याची पत्नी होऊन सरस्वती तिथे राहिली. त्याच्यापासून तिला मुलगा झाला. त्याचा जन्म झाल्याबरोबर सरस्वतीच्या शापाचा अंत झाला. मग मुलाला सोडून ती ब्रह्मलोकी परत गेली. तिच्याबरोबर सावित्री होतीच.

सरस्वतीचा मुलगा सारस्वत. त्याला दधीचाने

आपली भावजय अक्षमाला हिच्या ओटीत घातला आणि 'याचा तू आपल्या मुलाप्रमाणे सांभाळ कर,' असं सांगितलं. त्याप्रमाणे सारस्वत आणि वत्स हा अक्षमालेचा मुलगा, हे दोघेही बरोबर वाढले. तेव्हा, सांगा पाहू ? आहेत की नाही नदीसारख्याच नागमोडी चालणाऱ्या या कहाण्या ?

सावित्री

सावित्री हे नाव सवितृ म्हणजे सूर्य याच्यापासून आलं. सवितृ किंवा सविता म्हणजे प्रसवणारा. सूर्याचं दुसरं स्वरूप म्हणजेच विष्णु किंवा नारायण असं ही आहे. सूर्य हा काळाचा स्वामी आहे. विश्वाची निर्माण शक्ती आहे. तेव्हा निसर्गाच्या रूपकाप्रमाणे सूर्य आणि सावित्री यांना वेदवाङमयात पति-पत्नी असं म्हटलेलं आढळतं.

वेदात किंवा पुराणांच्या कथावाङमयात एकही स्त्री-देवता अशी नाही की ती एकाच देवाची पत्नी आहे. देवांना दोन, तीन किंवा अधिक बायका असतात, तसे देवींनाही वेगवेगळे पती असतात, असे या कथा वाचल्यावर कळतं. देवींच्या बाबतीत एवढं मात्र खरं की नंतरच्या काळात लक्ष्मी, सावित्री, उमा किंवा अंबिका या देवता आपल्या पतीशी एकरूप झाल्या. विष्णूची लक्ष्मी ही नितांत प्रेमळ, आणि सेवापरायण पत्नी झाली. सावित्री ब्रह्मदेवाशी एकनिष्ठ होऊन त्याच्या कार्यात त्याला मदत करती झाली आणि अजूनही करते अशी

समजूत आहे. शंकराची उमा तर काय सांगावी ? याप्रमाणे परंपरेने देवींच्या प्राकृतिक स्वरुपाला न बदलता त्यांच्या कार्याला पवित्रतेचं वलय दिलं. त्यांना जगन्माता बनवलं; पतिव्रता केलं. कन्या, तरुणी, वृद्धा या अवस्थेतल्या नारीपणाला त्यांच्यामुळे वेगळं सौंदर्य लाभलं. स्त्रीचं स्त्रीत्व आकाराला आलं.

सावित्रीला गायत्री असंही वेदवाङमयात नाव आहे. ती अदितीचं एक रूप आहे असंही मानलं आहे. मातृत्व हा अदितीचा विशेष गुण. तोच सावित्रीत यावा यात नवल नाही. सावित्री सुरेख होती असं म्हटलं आहे; पण तिचं मूर्त स्वरूप आपल्यापुढे उभं राहात नाही. गायत्री, सावित्री यांच्या प्रतिमा किंवा चित्रं काढायची तर ती सरस्वतीप्रमाणेच काढली जावीत असं पुराणात म्हटलं आहे. या तिन्ही देवतांचा संबंध अतूट आहे, पण सरस्वतीच्या व लक्ष्मीच्या रंगा-रूपाचं जसं स्पष्ट चित्र आपल्यापुढे उभं राहातं, तसं सावित्रीचं राहात नाही. त्यामुळे सावित्री ही देवता तशी आकृतिमय नाहीच.

सावित्री ही देवता नदीरूपातही आढळते. सरस्वती देखील नदी आणि देवता अशा दोन भूमिकांत वावरते. सावित्री वेदमाता आहे; प्रसवाची देवता आहे; संतती देणारी आहे. नदीरूप असल्याने अन्नदाही आहे. आता

आपण सावित्रीच्या कथांकडे वळूया.

सावित्रीची उत्पत्ती

सावित्रीची एक उप्तत्ती कथा अशी की ब्रह्मदेवानं आपल्या चिंतनातून वेद आणि शास्त्र उत्पन्न केली. त्यानंतर त्यानं मरीची, अत्री, पुलस्त्य, पुलह, क्रतु प्रचेनस, वसिष्ठ, भृगु, अंगीरस आणि नारद असे दहा पुत्र, आपल्या मनोबळाने निर्माण केले. पण हे मानसपुत्र निर्माण करून ब्रह्मदेवाचं समाधान झालं नाही. सृष्टी, म्हणजेच प्रजा निर्माण करण्याचं मोठं कार्य त्याला करायचं होतं. तेव्हा त्यानं सावित्रीवर मन एकाग्र केलं; इतकं की ती एकाग्रता त्याच्या शरीराचा एक भाग बनली आणि त्यातून सावित्री देवी निघाली.

सावित्रीच्या उप्तत्तीची दुसरी कथा अशी : ब्रह्मदेवानं सरस्वतीशी लग्न केल्यामुळे त्याला बट्टा लागला आणि त्यानं तिला सोडून तप आरंभलं. त्याच्या शरीराचे दोन भाग होऊन त्याची अर्धांगी म्हणजे पत्नी निघाली; कारण या वेळी त्याला हवी होती ती पत्नीच. ही पत्नी म्हणजेच सावित्री. या जोडप्याला जी संतती झाली ती म्हणजे वेद, शास्त्रं, संवत्सर किंवा वर्ष, दिवस, रात्र, उषा आणि संध्या. सावित्री आणि सरस्वती या दोघी एकमेकींबरोबर राहू लागल्या. कुणी म्हणतात की

सावित्री नि सरस्वती दोघी नसून एकीचीच दोन नावं होती.

ब्रह्मदेव आणि सावित्री यांचा संबंध वेदात आला आणि तो लोकपरंपरेत पण कायम राहिला. वेदात व पुराणात सावित्रीचं काम सृष्टी निर्माण करण्याचं होतं. ब्रह्मदेव, मनू आणि मानव यांचा संबंध अतूटच आहे. सरस्वती आणि सावित्री ही एकाच देवीची दोन रूपं आहेत, असं पुराणं सांगतात. त्याप्रमाणे मनू सरस्वतीचा म्हणजे सावित्रीचाही मुलगा ठरतो. त्याच्यापासून मानवी प्रजा झाली. तसेच विश्वजननी म्हणून सावित्रीची दोन रूपं आपल्याला दिसतात. एक ती वेद आणि शास्त्र निर्माण करणारी बुद्धिदाती आणि धर्मदाती देवता आहे. सरस्वतीप्रमाणेच. पण ती दिवस, रात्र, पहाट आणि सायंकाळ निर्माण करणारी विद्या यांची कालशक्ती पण आहे. कालांचं भान तिनंच निर्माण केलं.

सावित्री आणि गायत्री

ब्रह्मदेवाच्या दोन स्त्रिया होत्या. सावित्री आणि गायत्री. त्यांना घेऊन तो पुष्कर बेटात एका कमळात सुखाने राहायचा. एकदा काय झालं सह्याद्री पर्वतावर महाबळेश्वर तीर्थावर ब्रह्मदेवानं यज्ञ करायचं ठरवलं. यज्ञासाठी त्यानं सर्व देवांना आणि ऋषींना आमंत्रण

दिलं. सारेजण आले. यज्ञाची तयारी झाली. यज्ञ पतिपत्नींनी करायचा असल्यामुळे ब्रह्मदेवानं सावित्रीला स्नान करून यायला सांगितलं. ती गेली; पण तिला यायला वेळ लागला. यज्ञाचा मुहूर्त टळू लागला. हे पाहून देवांनी गायत्रीला ब्रह्मदेवाजवळ बसायला सांगितलं. यज्ञाला प्रारंभ झाला नि सावित्री आली. ब्रह्मदेवाशेजारी गायत्री बसलेली पाहून तिला संताप आला. देवांनी मुद्दाम आपला अपमान केला असं तिला वाटलं. तिनं देवांना शाप दिला, "तुम्ही पृथ्वीवर नद्या व्हाल."

हा तिचा शाप ऐकून गायत्रीला राग आला. तिनं सावित्रीला शाप दिला की "तू पण नदी होशील नि समुद्राला मिळशील."

देवांना हा शाप ऐकून वाईट वाटलं. ते सावित्रीला म्हणाले, "सावित्री, आम्ही सर्वजण नद्या झालो तर जगात हाहाकार होईल. जगाचे सारे व्यवहार बंद होतील. दिवसरात्र नाहीशी होऊन सर्वत्र प्रलय होईल; यावर तू विचार केला आहेस का ? कृपा करून आपला शाप परत घे."

सावित्रीला आपल्या शापामुळे होणाऱ्या अनर्थाची कल्पना आली. ती म्हणाली, "माझा शाप मला पूर्णपणे

मागे घेता यायचा नाही. तुम्ही अंशतः नद्या व्हाल." त्याप्रमाणे कृष्णा नदीत विष्णु आहे. महानदीत महादेव आहे. ब्रह्मकमंडळीत ब्रह्मदेव आहे. स्वतः सावित्री देखील नदी झालीच.

याच कथेचा दुसरा पर्याय असा : एकदा प्रभास तीर्थावर देवांनी यज्ञ करायचा ठरवला. त्यावेळी ब्रह्मदेव यजमान म्हणून यज्ञात काम करणार होता. त्यामुळे सावित्री ही यजमान-पत्नी ठरलेलीच होती. यज्ञासाठी ती स्नान करायला गेली. ठरलेला मुहूर्त टळण्याची वेळ आली तरी सावित्री परत आली नाही; तेव्हा देव अस्वस्थ झाले. त्यावेळी जवळूनच गवळ्याची देखणी मुलगी जात होती. तीच गायत्री. तिला विनवणी करून देवांनी तिला ब्रह्मदेवाची पत्नी म्हणून बसवलं. यज्ञ सुरू झाला. ब्रह्मदेवाची पत्नी होण्याचं भाग्य मिळालं म्हणून गायत्रीलाही आनंद झाला. होमहवन सुरू झालं; तेवढ्यात सावित्री तिथे आली. आपल्या जागी एका क्षुद्र मुलीला बसवलेलं पाहून तिला संताप आला. पतीने आपला पाणउतारा केल्यामुळे ती फणफणत त्याला म्हणाली, "ब्रह्मदेवा आजपासून तुमची पूजा कुणी करणार नाही." तेव्हापासून ब्रह्मदेवाची प्रतिष्ठा कमी झाली. ब्रह्मदेवाचं मंदिर क्वचितच कुठे असतं.

सावित्री-देवीची कथा

सावित्रीच्या संबंधातली एक कथा अशी : ब्रह्मदेवाचा मुख्य गुण म्हणजे सृष्टी निर्माण करण्याचा. सारं चराचर त्यानं निर्माण केलं. त्याला माणूस तर फार आवडायचा. तो एकदा जेवायला पानावर बसला असताना, त्यानं आचमनासाठी पाणी उजव्या हातात घेतलं; तोच त्याच्या मनात एका सुंदर बालकाची कल्पना आली. ब्रह्मदेवाची कल्पना नि कृती यात काहीच फरक नव्हता. क्षणार्धात हातातल्या पाण्यात त्याला एका सुंदर बाळाची आकृती दिसली. हातपाय हलवीत खेळणारं ते बाळ पाहून ब्रह्मदेवाला फार आनंद झाला. त्यानं सावित्रीला ते बाळ दिलं. ब्रह्मदेवानं त्याचं नाव अत्रि ठेवलं. अत्रि मोठ्या लाडाकोडात वाढला. पण त्याचं सारं लक्ष विद्या शिकण्याकडे होतं. सारे वेद तो शिकला. तप देखील करू लागला; ऋषी झाला. अत्रि सप्तर्षीपैकी एक ऋषी आहे.

या अत्रि ऋषीचा मुलगा सोम हा देखील बापाप्रमाणे सर्व विद्यांत पारंगत झाला. त्यालाही लोक सोम-ऋषी म्हणू लागले.

एकदा काय झालं ? सोम ऋषीला आपण देशोदेशी फिरावं असं वाटू लागलं. नाना देश तो हिंडला. त्याला

शहरं आवडू लागली. आश्रमात न राहाता शहरातच राहावं असं त्याच्या मनानं घेतलं. एवढंच नाही, तर आपण तापसाप्रमाणे राहायचं नाही; राजाच व्हायचं असा ध्यास त्याला लागला. एकदा तो भागीरथी नदीच्या काठी आला. तेव्हा एक हत्ती आपल्या सोंडेने एक मोठा वृक्ष गदगदा हालवताना त्याला दिसला. त्या झाडावर पारव्यांची घरटी होती. झाडं गदागदा हलवल्यामुळे सारे पारवे केकाटू लागले. इतकंच नव्हे तर ते पक्षी एकजूट करून हत्तीवर तुटून पडले; आपल्या चोचींनी हत्तीला टोचू लागले. हजारो पारव्यांनी हत्तीचे डोळे फोडले; त्याला घायाळ केले. हत्ती शेवटी टेकीला आला नि निसटून जायला बघू लागला; पण पारव्यांनी कोंडी करून त्याला इतकं जायबंदी केलं की तो बलिष्ठ हत्ती अगदी हतबल होऊन खाली कोसळला नि लवकरच कण्हत कुंथत मेला. हे दृश्य पाहून सोम चकित झाला. पक्ष्यांचा पराक्रम पाहून त्याला आपल्या दुबळेपणाची लाज वाटू लागली. पारव्यांनी हत्तीला मारून आपल्या पिल्लांचं रक्षण केलं होतं, तसं आपल्यालाही काही तरी करता येणार नाही का, असा विचार सोमच्या मनात आला.

झाडाखाली हत्ती मरून पडला होता नि केवळ पक्ष्यांच्या पराक्रमामुळे. सोमला वाटलं त्या जागेचाच हा

आपल्या सैन्याला प्रोत्साहन दिलेलं पाहून सोमराजाला देखील चेव आला. त्यानं आपल्या सैन्याला दुप्पट उत्तेजन दिलं. निकराचं युद्ध झालं; पण इंद्राचा पराभव होऊ लागला. तेव्हा देवगुरु बृहस्पती यांनी सल्ला दिला की सोमेश्वर अजिंक्य आहे कारण ब्रह्मदेवानंच त्याला शस्त्रास्त्र-विद्या दिल्या आहेत; तेव्हा तू पद्मावतीला नि निर्माल्याला घेऊन अमरावतीला जा. त्याप्रमाणे इंद्र त्या दोघांना घेऊन पळून गेला.

इंद्र पळाल्यावर सोमेश्वरानं कुबेर, वरुण वगैरे आठही दिक्पालांचा पराभव केला. मग त्यानं स्वर्गाकडे मोर्चा वळवला. सोमेश्वराला, राक्षस आणि पक्षीराजे यांनीही साहाय्य केलं. या सैन्याने यमाचाही पराभव केला. ते सारेजण इंद्राच्या आश्रयाला गेले. एका राक्षसानी इंद्राला रथासकट गिळून टाकलं; तेव्हा बृहस्पतीनं राक्षसाचं पोट फाडून इंद्राची सुटका केली. पण एका पक्ष्याने बृहस्पतीलाच गिळून टाकलं नि दुसऱ्या पक्ष्याने इंद्राला. सोमराजा विजयाने अमरावतीत शिरला. त्यानं पद्मावतीला सभेत आणलं. अत्यानंदानं तिनं सोमराजाला नमस्कार केला आणि त्याच्याशेजारी त्याची राणी म्हणून ती बसली.

इकडे इंद्राची ही अवस्था पाहून नारदाला वाईट

वाटलं. ब्रह्मलोकात जाऊन त्यानं ब्रह्मदेवाला ही हकिगत सांगितली. ब्रह्मदेव नारदाला बरोबर घेऊन विष्णूकडे गेला. मग ते तिघेही महादेवाकडे गेले. सारी कथा कळल्यावर महादेव आपली सारी आयुधं नि अस्त्र घेऊन त्या तिघांसह सोमेश्वराचा पाडाव करायला निघाला.

युद्धाला तोंड लागलं. प्रथम ब्रह्मदेव लढायला आला. तेव्हा सोमराजाचा मित्र पुष्करद्वीपाल वेसर राजा त्याच्यावर चाल करून गेला. त्यानं जोरात श्वास घेतला; त्याबरोबर ब्रह्मदेव त्याच्या एका नाकपुडीत आत बाहेर करीत झोके खाऊ लागला. विष्णूचीही तीच गत झाली. वेसराच्या दुसऱ्या नाकपुडीत तो आत बाहेर झोके खाऊ लागला. तेव्हा महादेव स्वतः लढायला उभा राहिला; पण सोमेश्वराने महादेवाच्या पाशुपत अस्त्राचं निवारण तर केलंच; वर आपल्या बाणाने मोहिनी निर्माण केली. तिचं सुंदर रूप पाहून महादेव तिच्याकडे टक लावून बघतच राहिला. मग सोमेश्वरानं शिवाच्या गणांना बाणांची वृष्टी करून पळवून लावलं.

ब्रह्मा, विष्णू, महेश यांची ही अवस्था पाहून नारद काळजीत पडला; कारण या प्रकाराला तोच जबाबदार होता. नारदाला शोक आवरेना. त्यानं अग्नीत उडी

टाकून आत्महत्या करायचं ठरवलं. तो आगीत उडी टाकणार इतक्यात आकाशवाणी झाली, ''नारदा, तू जीव देऊ नको. तू सावित्री, लक्ष्मी नि पार्वती यांच्याकडे जा. त्यांना सारं सांग. त्या आपापल्या पतीची सुटका करून, इंद्रालाही त्याचं सिंहासन देतील.''

नारद लगेच सावित्रीकडे गेला. तिच्या पाया पडून त्यानं तिला तिच्या नातवानं देवांची काय दुर्दशा केली ते सांगितलं. सावित्री त्याला घेऊन लक्ष्मीकडे गेली. लक्ष्मी नि सावित्री नारदाला घेऊन पार्वतीकडे गेल्या. मग त्या तिघी सोमेश्वराकडे जायला निघाल्या. हातात सोन्याची रत्नजडीत ताटे घेऊन त्यात सोन्याचे दिवे ठेवून त्या सोमेश्वराला ओवाळायला इंद्रलोकात गेल्या.

तिघी आदिमाता आपल्याला ओवाळायला येताहेत असे पाहून सोमेश्वर अनवाणीच इंद्राच्या मंदिरापाशी आला आणि मातांना सामोरा जाऊन त्याने त्यांना लोटांगण घातले. आपल्या नातवाला पाहून सावित्रीला प्रेमाचं भरतं आलं. तिनं त्याला ओवाळलं नि छातीशी घट्ट धरलं. लक्ष्मी नि पार्वती यांनीही त्याला ओवाळलं. सोमेश्वराचा दर्प गळून गेला. तो नम्र झाला. त्यानं मोहिनी अस्त्र काढून घेतलं. महादेवानं त्याला आलिंगन दिलं आणि म्हणाला, ''सोमेश्वरा, तुझ्यासारखा वीर

मला कुठेही आढळला नाही. आता तू ब्रह्मदेव नि विष्णु यांची सुटका कर.'' ताबडतोब वेसरानं त्यांचीही सुटका केली आणि त्या देवांचीही क्षमा मागितली.

सावित्री ऊर्फ षष्ठी

परंपरेत सावित्री ही प्रसवाची देवता 'षष्ठी' या नावानं प्रसिद्ध आहे. ही बालकाचा जन्म सुखकर करते; त्याची रोगराईपासून मुक्तता करते; बायकांचं वांझपण घालवते अशी समजूत आहे. एवढंच नाही तर ही षष्ठी बालकाच्या भाग्याचा आलेख त्याच्या कपाळावर लिहिते; म्हणून मूल जन्मलं की सहाव्या दिवशी षष्ठीची पूजा करण्याची प्रथा आहे. सहाव्या दिवशी षष्ठी येते आणि मुलाच्या कपाळावरचा लेख लिहिते, असं लोक मानतात. पण खरं तर हा लेख लिहिण्याचंच काम तेवढं तिचं आहे. त्यातला मजकूर ब्रह्मदेवच ठरवतो. तो सांगतो ते सावित्री किंवा षष्ठी लिहिते. महाराष्ट्रात तिला सटवी म्हणतात. पाचव्या दिवशी बाळंतिणीच्या खोलीत बरमा (ब्रह्मदेव) आणि सटवी यांची पूजा करतात. मध्यरात्री सटवी येते अशी समजूत आहे. याबद्दलची एक गोष्ट अशी; सटवीला एक मुलगी होती. तिचं नाव नटवी. आपली आई रात्र नाही, दिवस नाही सारखी कुठे जाते ते नटवीला माहीत नव्हते. एक दिवस सटवी घाईघाईने

बाहेर पडताना नटवीनं विचारलं, "आई, कुठे चाललीस ?"

सटवी म्हणाली, "एक बाई बाळंत झाली आहे. तिच्या मुलाच्या कपाळावर त्याचं भविष्य लिहायला जाते."

नटवी म्हणाली, "आई माझ्या कपाळावर काय लिहिलं आहेस तू ? ते सांगितल्याशिवाय सोडणार नाही."

सटवी घुटमळली; पण जायला उशीर होईल नि ब्रह्मदेव रागावेल म्हणून ती नटवीला म्हणाली, "ऐक बापडी ! तुझ्या नशिबात तुझं लग्न तुझ्या मुलाशी होईल असं लिहिलं आहे."

"आई, मी लग्नच करणार नाही. मग मुलगा कसा होईल ?"

"तू काही कर. होणारं टळणार नाही," असं म्हणून सटवी निघून गेली.

नटवीनं मग कुमारीच राहायचं ठरवलं. पण एकदा रस्त्यातून जाताना एका पुरुषाची लघवी नटवीनं ओलांडली आणि तिला गर्भ राहिला; मुलगा झाला. अर्धं भविष्य खरं झालं. पुढचं होऊ नये म्हणून नटवीनं तो

मुलगा सोडून दिला.

एका श्रीमंतानं ते मूल पाहिलं. तो निपुत्रिक होता. त्यानं त्या मुलाला घरी नेलं नि वाढवलं. पुढे तो मुलगा मोठा झाला; नावारुपाला आला. एकदा नटवी त्या गावी आली. त्या तरुणाने तिला पाहिली आणि लग्नाची मागणी घातली. नटवीलाही तो आवडला होताच. तिचं त्या तरुणाशी लग्न झालं. पुढे तिला मुलगा झाला. बारशाच्या दिवशी त्या तरुणाच्या दत्तक बापानं एक दुपटं नातवाच्या अंगावर घातलं. याच दुपट्यात आपल्या मूलाला गुंडाळून नटवीनं सोडून दिलं होतं. ते दुपटं पाहिल्यावर नटवीनं कपाळावर हात मारला आणि ती रडत-रडत निघून गेली.

अदिती

अदिति' या शब्दाचा अर्थ जिला 'दिति' म्हणजे मर्यादा नाही अशी. ही अदिती म्हणजे आकाश नि पृथ्वी यांना व्यापून उरलेली आदिमाता; देवांची माता; जगज्जननी. हीच जन्मदात्री, हीच पोषण करणारी, हीच मारणारी.

अदितीचा उल्लेख ऋग्वेदात चौऱ्यांशी वेळा आला आहे; पण जसं उषेचं नि पृथ्वीचं ढळढळीत चित्र थोडेच उल्लेख असून आपल्या पुढे उभं राहातं तसं अदितीचं होत नाही. तिचं रंग, रूप आपल्याला कळतच नाही. परंतु तिचा प्रभाव मात्र समजतो.

जगभर आदिशक्ती, आदिदेवता, महामाता, महादेवी म्हणून जगन्मातेबद्दलची जी संकल्पना रूढ आहे त्यात अदिती प्रथम येते असं मानलं तर चूक होणार नाही. वेदात म्हटलं आहे की अदिती आकाश आहे; अदिती पृथ्वी आहे. ती प्राणिमात्रांची माता तर आहेच पण मूळ ती देवाची माता आहे. अदितीचा पती कोण ते कुठेच सांगितलेलं नाही. प्रारंभ काळात

मातृसत्ताच मान्य होती. पूज्य होती. अदिती ही मातृसत्तेचं आद्य प्रतिक आहे.

देवमाता

अदिती ही देवमाता असून आदित्य हे तिचे मुलगे. मित्र, अर्यमा, भग, वरुण, दक्ष, इंद्र ही तिच्या मुलांची नावे. त्यामुळे ती देवमाता आहे, तशीच राजमाता पण आहे. वेदात पृथ्वीसुद्धा लोकमाता आहे. मातृत्व हा पृथ्वीचा प्रधान गुण आहे नि आकाश तिचा पती आहे. पण अदिती मात्र एकटीच आहे. पुढे महाभारतात मात्र अदिती कश्यपाची पत्नी असल्याचे म्हटले आहे.

ऋग्वेदात अदितीला गाय म्हटलं आहे. तिचं दूध जगाचं पोषण करतं. ती सुष्टी व पुष्टी देते. ती जगात सत्य व नियम आणते; देवांना आणि माणसांना जीवन जगण्याचा सुसूत्र मार्ग दाखवते. तिचं सामर्थ्य अतर्क्य आहे. सदाचरपणाचा मार्ग तिनेच घालून दिल्यामुळे तो न आचरणाऱ्याला ती शासनही करते. ती रोग नि संकट यांच्या पाशातून (बंधनातून) प्राणिमात्रांना मुक्त करते. आदिमायेची मूळ प्रतिकृती अदितीच आहे असे म्हटले तरी चालेल

महामाता : महालक्ष्मी

अदितीचं लक्ष्मी, सरस्वती, सावित्री आणि रुद्राणी

किंवा उमा, ऊर्फ अंबिका यांच्याशी जुळलेले संबंधच नव्हेत तर त्या त्या देवतेशी झालेलं अदितीचं एकीकरण होऊन जगन्माता जगदंबा अस्तित्वात आली हे आपल्याला वेदातच सांगितलेलं आढळतं.

महालक्ष्मीचं पाहा ना ! पुराणात अशी छोटीशी गोष्ट आहे की महालक्ष्मी ही आद्यशक्ती असून तिच्यापासून वेगवेगळ्या देवींची रुपं निघाली. महालक्ष्मीने प्रथम तीन अंडी घातली. एका अंड्यातून ब्रह्मा निघाला, त्याच अंड्यातून त्याच्याबरोबर श्री आणि सरस्वती निघाल्या. दुसऱ्या अंड्यातून शिव नि विष्णु निघाले. तिसऱ्या अंड्यातून निघाली ती अंबिका.

तसं पाहिल तर ही आदिशक्तीची कल्पना पूर्वीच्या हिरण्यगर्भाच्या, प्रजापतीच्या किंवा परमात्म्याच्या कल्पनेचाच स्त्री रुपातला आविष्कार आहे; परमपुरुषाचं शक्तिरूपात झालेलं नवं रूपक आहे. इथे महालक्ष्मी हीच आदिशक्ती आहे. परमात्म्याने ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांना जन्म दिला. देवींच्या मधली त्रयी म्हणजे लक्ष्मी, सरस्वती आणि अंबिका ऊर्फ दुर्गा. इथे या देवता महालक्ष्मीपासून झाल्या असं म्हटलं आहे.

अदिती : सरस्वती

सरस्वती ब्रह्मदेवाबरोबरच महालक्ष्मीच्या

अंड्यापासून निघाली; हे मागे पाहिलंच आहे. परमेष्ठीने ऊर्फ ब्रह्मदेवाने आपल्या मनाने मुलगे उत्पन्न केले; त्यांना मानसपुत्र म्हणतात. हे सारे पुत्र अत्यंत ज्ञानी होते; पण त्यांना वासना नव्हती. ते उदास होते. विरक्त होते. सुखोपभोग म्हणजे काय ते त्यांना माहीतच नव्हतं. हे पाहून ब्रह्मदेव चिंतेत पडला. त्याला वेगवेगळे जीव तयार करायचे होते. देव निर्मायचे होते. देवी करायच्या होत्या. पण हे पुत्र तर नुसते उदास होते. ध्यानात मग्न होते. सृष्टी घडायची कशी ? तो विचारात पडला. पुष्कळ विचार केला तरी उत्तर सापडेना तेव्हा तो त्रासला, चिडला, रागावला. त्याचा क्रोध प्रचंड होता. त्यातून एक पुरुष-आदिपुरुष निघाला. ब्रह्मदेव त्याला म्हणाला, "तुझ्या देहाचे तू दोन वेगळे भाग कर." त्याप्रमाणे पुरुषाच्या अर्ध्या देहातून पुरुषाची आकृती आणि अर्ध्यातून स्त्रीची आकृती निघाली. मग ब्रह्मदेवाने पुरुषाकृतीला तू आपले वेगळे भाग कर असं सांगितलं. "ठीक आहे" असं म्हणून पुरुषानं आपल्या देहाचे अकरा भाग केले. तेच रुद्र. त्यानंतर ब्रह्मदेवानं स्त्री आकृतीलाही आपल्या देहाचे भाग करायला सांगितले; पण ही स्त्री आकृती पुरुषापेक्षा वेगळीच होती. तिचा अर्धा भाग काळा नि अर्धा गोरा होता. ब्रह्मदेवाच्या आज्ञेप्रमाणे तिने केले. तिच्या गोऱ्या

भागातून स्वादा, स्वधा, मेधा, लक्ष्मी, सरस्वती आणि गौरी या देवता निघाल्या.

थोडक्यात सांगायचं तर अदितीची स्पष्ट कथा कुठे आढळली नाही तरी आदिमाता म्हणून ती महत्वाची आहे. एवढेच नव्हे तर महादेवी, महामाया म्हणून जी स्त्रीरूप देवतेची संकल्पना जगभर रुढ आहे, तिचे बीज अदितीत निश्चितच आहे; आणि म्हणूनच अदितीशिवाय आमच्या देवतांच्या इतिहासाला आकारच येत नाही.

लक्ष्मी

लक्ष्मी ही नारायणाची पत्नी म्हणून पुराणकाळापासून आपण ओळखतो. लक्ष्मी ही अत्यंत लावण्यवती, ललित-रम्य वृत्तीची, विलासप्रिय, पतिपरायण, जगात यश, कल्याण, ऐश्वर्य आणि सौंदर्य आणणारी देवी म्हणून प्रसिद्ध आहे. शिव-पार्वती आणि लक्ष्मी-नारायण या जोडप्यांपैकी कोण अधिक सरस आहे, असा विचार केल्यास लक्ष्मी-नारायणाकडेच आदर्श जोडपं म्हणून बोट दाखवावं लागत. कुठल्याही अनुरुप जोडप्यास 'लक्ष्मी-नारायणाचा जोडा' असं संबोधण्याची आपली रीत आहे.

लक्ष्मी गौर वर्णाची, प्रसन्न वदनाची, अलंकार आणि सुंदर वेषभूषा धारण करणारी, कमलगंधा, कमल नयना अशी चिरयौवना देवी असून कमळ हे तिचं वसतीस्थान आहे.

वेदवाङ्मयात तिचा उल्लेख 'श्री' असा करतात. श्री ही उत्कर्षाची, सौंदर्याची, सुफलतेची देवता असून तिचं कमळाशी अतूट नातं आहे. ती अन्नदा आहे; ती शुभदा

आहे असं आपल्याला श्रीसूक्तावरून कळतं.

सरस्वतीचं मूळचं रूप नदीचं आहे. लक्ष्मीचं मात्र मूळ रूप नदीचं नाही. पण तरीही जलाशयाशी तिचा संबंध अतूट आहे; कारण पुराणकथेप्रमाणे तिची उप्तत्ती समुद्रापासून झालेली आहे. देव आणि दानव अमृताची प्राप्ती व्हावी म्हणून समुद्रमंथन करीत असताना चौदा रत्नं निघाली. त्यातलं एक रत्न म्हणजे लक्ष्मी. हीच विष्णूची किंवा नारायणाची भार्या. एका गोष्टीत असं म्हटलं आहे की लक्ष्मी समुद्रातून बाहेर आली; तेव्हा तिचं अलौकिक सौंदर्य पाहून देव आणि दैत्य भुलले. पण तिनं त्यांना वरलं नाही. हातात माळ घेऊन ती क्षीरसागरात निजलेल्या विष्णूकडे आली आणि त्याला माळ घालून त्याचे पाय चुरीत बसली. काही काळानं विष्णूला जाग आल्यावर त्यानं तिला पाहिली. तो प्रसन्न झाला. विष्णु आणि लक्ष्मी यांचं सांसारिक जीवन अतिशय सुखी आणि सहानुभूतीने भरलेलं होतं.

लक्ष्मीचा चंचलपणा

लक्ष्मी प्रथम इंद्राजवळ रहात असे अशी कथा आहे. आपण शेवटी विष्णूजवळच कायम राहाणार आहोत असं तिनं इंद्राला सांगितलं होत. इंद्राच्या शेजारी ती बसली असताना दुर्वास ऋषींनी संतानक पुष्पांची माळ

इंद्राला दिली. त्यानं ती ऐरावत हत्तीच्या पाठीवर ठेवली. हत्तीने ती पाडून तुडवली. याचा दुर्वास ऋषींना फार राग आला. लक्ष्मीवर मोहित झाल्यानं इंद्र उन्मत झाला होता. तेव्हा त्यांनी लक्ष्मी तिन्ही जगातून नाहीशी होईल असा शाप दिला. इंद्राला लक्ष्मीची खात्री नव्हतीच. लक्ष्मी पाताळात जाऊन राहिली.

लक्ष्मी गेल्यावर स्वर्गात आणि पृथ्वीवर दैन्य आले. इंद्रानं याबद्दल विष्णूला विचारलं, तेव्हा 'समुद्रमंथन करून लक्ष्मीला वर काढा' असं विष्णूनं सुचवलं. त्याप्रमाणे समुद्रातून लक्ष्मी वर आल्यावर त्रिभुवनात आनंद आला. इंद्रानं तिला सुंदर आसन दिलं. नद्यांनी पवित्र पाणी सोन्याच्या पात्रातून आणून दिलं. पृथ्वीने तिला औषधी दिल्या. गाईंनी पंचगव्य दिलं. दिग्गजांनी तिला स्नान घातलं. गंधर्व-अप्सरा नृत्य-गान करू लागले. समुद्रानं तिला रेशमी वस्त्रांची जोडी दिली. वरुणानं वैजयंती माळ आणि सरस्वतीनं रत्नांची माळ दिली. विश्वकर्म्यानं सुंदर वस्त्र दिलं. ब्रह्मदेवानं तिला कमळांनी सजवलं. सर्पांनी तिला रत्नांची कुंडलं दिली. मग नटून थटून लक्ष्मी वरसंशोधन करायला निघाली आणि तिनं विष्णूला वरलं.

लक्ष्मी समुद्रातून वर आली तेव्हा ती कमळावर उभी

होती. तिला चार हात होते. एका हातात कमळ, दुसऱ्या हातात माळ, तिसऱ्या हातात धान्याचे पात्र आणि चवथ्या हातात महाळुंग होतं.

लक्ष्मी आणि सरस्वती यांचं पटत नाही अशी रूढ समजूत आहे. त्या संबंधी पुराणातली कथा अशी आहे. सुरुवातीला लक्ष्मी, गंगा आणि सरस्वती विष्णूकडेच रहायच्या. एकदा गंगा आणि सरस्वती या दोघींचं भांडण जुंपलं. त्यावेळी लक्ष्मी मध्ये पडली आणि तिनं त्यांना 'भांडू नका' असं सांगितलं. सरस्वतीला फार राग आला. सरस्वती लक्ष्मीवर इतकी संतापली की तिनं लक्ष्मीला 'तू झाड आणि नदी होशील' असा शाप दिला. तेवढ्यात बाहेर गेलेला विष्णु परत आला. भांडणाची हकिगत कळल्यावर त्यानं लक्ष्मीची बाजू घेतली. गंगेला त्यानं शिवाकडे पाठवून दिलं आणि सरस्वतीची रवानगी ब्रह्मदेवाकडे केली.

लक्ष्मी चंचल आहे; ती कुठेच स्थिर राहात नाही अशी समजूत आहे. अथर्ववेदांत तर पापी लक्ष्मी आणि पुण्य लक्ष्मी अशी तिची दोन स्वरूपं वर्णन केली आहेत. पापी लक्ष्मी मृत्यू आणि विपदा आणणारी आहे; तर पुण्य लक्ष्मी ही राजलक्ष्मी आहे, गृहलक्ष्मी आहे आणि धान्यलक्ष्मी पण आहे. पापलक्ष्मी म्हणजेच अलक्ष्मी किंवा

ज्येष्ठा. वेदकालापासून अलक्ष्मीचा उल्लेख आढळतो. तिच्याबद्दलची कथा अशी : समुद्रमंथनाच्या वेळी कालकूट विष बाहेर पडलं. त्या विषातून अलक्ष्मी जन्मली. तिचा चेहरा काळा, डोळे लाल आणि केस पिंगट होते. ती वृद्ध होती; कळकट होती. ती लाल वस्त्र नेसली होती. तिनं गळ्यामध्ये लाल फुलांची माळ घातली होती.

विष्णूला लक्ष्मी पसंत पडली. पण जेव्हा त्यानं तिच्याशी लग्न करायचं ठरवलं; तेव्हा लक्ष्मी म्हणाली, ''माझ्या अक्काचं लग्न झाल्याशिवाय मी कसं लग्न करू ? तुम्ही तिला नवरा शोधा.''

विष्णूनं अलक्ष्मीचं लग्न उद्दालक ऋषीशी करून दिलं. पण तिनं त्याला इतका त्रास दिला की विचारायची सोय नाही. शेवटी तिला अश्वत्थ किंवा पिंपळाच्या झाडात बसवून उद्दालक पळून गेला. एक दिवस विष्णु लक्ष्मीबरोबर त्या झाडाजवळ आला. तिथे अलक्ष्मीला पाहून तो म्हणाला, ''तू इथे कायम राहा. शनिवारी लक्ष्मी या झाडात राहील. त्या दिवशी लोक या झाडाची पूजा करतील.''

गायी व लक्ष्मी

भीष्म शरपंजरी पडला होता त्यावेळी युधिष्ठिराने

अनेक प्रश्न त्याला विचारले. त्यात एक प्रश्न असा होता, ''भीष्म आजोबा, गाईच्या शेणामुतात लक्ष्मी असते असं म्हणतात. तर खरी गोष्ट काय आहे ?''

मृत्यूशय्येवर असलेला भीष्म म्हणाला, ''सांगतो ऐक. गोष्ट खरीच आहे. लक्ष्मी वृत्तीनं भटकीच. कधी एके ठिकाणी राहायची नाही; एकाला धरून राहायची नाही. पण तरी ती सर्वांना हवीहवीशी वाटायची.

एकदा काय झालं ? लक्ष्मी दैत्यांजवळ राहात होती. तिथे ती राहिल्यामुळे दैत्यांची भरभराट झाली. ते उन्मत झाले. तेव्हा त्यांना सोडून लक्ष्मी देवांजवळ राहायला गेली. देवही आनंदले नि उन्मत झाले. तेव्हा लक्ष्मीने त्यांनाही सोडलं नि ती कुठे राहावं म्हणून जागा शोधू लागली. हिंडता-हिंडता तिला गाईंचा कळप दिसला. नुकतीच ब्रह्मदेवाकडे गाईंनी प्रार्थना केली होती की ''आम्हाला पापाचा स्पर्श होऊ नये; आम्हाला स्वर्गलोकाची नि गोलोकाची प्राप्ति व्हावी; आम्हाला देवांसारखाच मान मिळावा. शंकराने नंदीला मोठा मान दिला आहे. त्याच्या ध्वजावर बैलाचंच चिन्ह असतं. तर देवा, तू आमची ही इच्छा पूर्ण कर'', आणि त्यांची ही कामना ब्रह्मदेवाने पूर्ण केली.

लक्ष्मी जेव्हा गाईंपुढे जाऊन उभी राहिली तेव्हा

गाईंनी विचारले, ''कोण तू ? का आलीस ?''

लक्ष्मी म्हणाली, ''मी सर्वांना प्रिय अशी लक्ष्मी आहे. मी दैत्यांचा त्याग करून देवांमध्ये राहायला आले तेव्हा देव सुखी झाले. आता मी तुमच्यात राहायला आले आहे.

गाई म्हणाल्या, ''देवी, तू फार चंचल आहेस. तुला चांगलं कोण, वाईट कोण ते पारखता येत नाही; म्हणून तू आमच्यात राहायला योग्य नाहीस.''

लक्ष्मी म्हणाली, ''गाईंनो, मी आपणहून तुमच्यात राहायला आले आहे; आणि तरीही तुम्ही मला ठेवून घेत नाही, हे बरं नव्हे''.

गाई म्हणाल्या, ''बाई, आम्ही तुझा अपमान करीत नाही; पण तू चंचल आहेस म्हणून तुला टाळतो आहोत.''

लक्ष्मी म्हणाली, ''गाईंनो, ब्रह्मदेवासकट सारे मला पुजतात. तेव्हा तुम्ही मला तुमच्यात राहू दिलं नाहीत तर जग तुम्हाला नावं ठेवील. तुम्हाला सोडून मी केव्हाच जाणार नाही. चंचलपणाला मीही कंटाळले आहे. तुमच्या शरीरात नम्र होऊन राहावं अशी माझी इच्छा आहे. तुमच्या शरीराचा जो सर्वात गलिच्छ भाग असेल

तो मला द्या. मी तो स्वीकारून पवित्र करीन; पण मी परत जाणार नाही. कायम तुमच्यातच राहाणार !".

लक्ष्मीचा निर्धार ऐकून गाईंनी विचारलं, "तर मग तू आमच्या शेणा-मुतात राहाशील काय ?".

"आनंदाने राहीन, कायम राहीन," लक्ष्मी म्हणाली. तेव्हापासून गाईचं शेण आणि गोमूत्र यांना लोक पवित्र मानू लागले.

लक्ष्मीसंबंधीची स्थानिक दंतकथा

पुरीच्या जगन्नाथाच्या मंदिरात बलराम, जगन्नाथ म्हणजेच विष्णु आणि सुभद्रा यांच्या मूर्ती आहेत. लक्ष्मीची मूर्ति तेथे नाही. ती मूर्ति तिथे का नाही याची कथा अशी : एकदा लक्ष्मी फिरत-फिरत खालच्या जातीच्या लोकांच्या वस्तीत गेली. त्यांनी तिचं चांगलं स्वागत केलं. लक्ष्मी त्यांच्यावर प्रसन्न झाली. मग तिचं तिथं जाणं वाढलं. बलरामाला हे आवडलं नाही. त्यानं विष्णूला सांगितलं, "तुझी बायको बाटली. तिला सोडून दे." विष्णूनं त्याप्रमाणे तिला सोडलं. मग लक्ष्मी खालच्या जातीच्या लोकांच्या वस्तीतच राहू लागली. पण ती गेल्यावर या दोघांचे खाण्यापिण्याचे हाल होऊ लागले. मग विष्णु त्या वस्तीत गेला. लक्ष्मीनं त्याला खायला दिलं आणि त्यानंही खाल्लं. पुढे बलरामही तिथे

जाऊ लागला. त्यालाही लक्ष्मीनं जेऊ-खाऊ घातलं. आता ती त्या वस्तीतच रमली होती. ती परत आली नाही. मात्र रथोत्सवाच्या दिवशी लक्ष्मी मंदिरात येऊन स्वंयपाक करून जाते, अशी लोकांची समजूत आहे.

रुक्मिणी हाही लक्ष्मीचाच अवतार

पंढरपूरला विठोबा-रखुमाई एका मंदिरात नाहीत. त्याची कथा अशी की विठोबाची राणी पदुबाई हिने त्याचा भक्त माळीराया याला 'जेवायला घालणार नाही' असं म्हटलं म्हणून विठोबानं तिला शाप दिला, "तुला वेड लागून तू एकटी भटकत मरशील. आपला संसार संपला." त्याप्रमाणे पदुबाई मेली.

भक्त माळीरायाला हे ऐकून दुःख झालं. पदुबाईच्या अस्थी पावसामुळे वाहून समुद्रात गेल्याचं त्यानं ऐकलं आणि त्यानं समुद्राकाठी बारा वर्ष तप केलं. "माझी आई परत दे," अशी तो समुद्राची प्रार्थना करीत होता. समुद्रानं त्याला अस्थी परत दिल्या आणि पंढरपुरच्या तळ्यात टाकायला सांगितल्या. त्या अस्थींतून कमळ वर आलं.

इकडे पदुबाई गेल्यावर विठोबा दुःखी झाला. भटकू लागला. पंढरपूरला तळ्यातून कमळ वर आलेलं पाहून त्याला मोह झाला नि त्यानं ते उपटलं. त्यातून पदुबाई

वर आली. पण आता त्यानं तिचं नाव बदललं आणि रुक्मिणी ठेवलं. पण आपली प्रतिज्ञा खरी करण्यासाठी विठोबानं तिला वेगळी ठेवली. त्याचं प्रेम मात्र तसंच राहिलं.

109

पुराणकथांतील देवतांबद्दल हजारो वर्षांपासून सगळ्यांनाच आकर्षण वाटत आलेलं आहे. अक्षयकथा या मालिकेत पुराणातील अशाच काही देवतांचा समावेश करण्यात आलेला आहे. या सर्वच कथा अतिशय रंजक आणि वैचित्र्यपूर्ण आहेत. या कथांमध्ये चित्रित केलेले स्त्री-मनाचे विविध अविष्कार आणि देव-देवतांचे गुंतागुंतीचे नातेसंबंध मानवी मनाशी जवळीक साधणारे आहेत. या अक्षयकथा दुर्गा भागवतांनी अत्यंत रसाळ आणि सुबोध शैलीत सांगितलेल्या आहेत. त्यांची भाषाशैली ही सर्व वयाच्या, सर्व थरांतील वाचकांशी सुसंवाद साधणारी आहे. या अक्षयकथांच्या अंतर्गत आम्ही प्रकाशित करीत असलेली पुस्तके खालीलप्रमाणे : पार्वती आणि कालिका • सरस्वती, सावित्री, अदिती, लक्ष्मी • सीता आणि रेणुका • मोहिनी, कन्याकुमारी, सुभद्रा

ओरिएंट लाँगमन

मुखपृष्ठ : बद्रीनारायण
सजावट : वसंत प्रधान

Durga Bhagwat Saraswati, Savitri, Aditi, Lakshmi (Marathi)
ISBN 0 86125 969 6

Orient Longman
Rs 18-0